# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३८** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- २१८** **दिनांक :-२२/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.१५/०१/२०२५ बुधवार रोजी सकाळी - ११.०० वाजता झालेली सभा क्र.३७ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.१५/०१/२०२५ बुधवार रोजी सकाळी - ११.०० वाजता झालेली सभा क्र.३७ चे कार्यवृत्त कायम करणे.

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.१५/०१/२०२५ बुधवार रोजी सकाळी - ११.०० वाजता झालेली सभा क्र.३७ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३८** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०२** **प्रशासक ठराव क्र.:- २१९** **दिनांक :-२२/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. विदयुत विभाग प्रमुख, विदयुत विभाग यांचेकडिल जा.क्र./मनपा/विदयुत/३६५/२०२४-२५ दि.१६/०१/२०२५
३. शहर अभियंता यांचा दि.२४/१२/२०२४ चा अभिप्राय
४. निविदा समितीचा दि.०८/०१/२०२५ चा निर्णय.

**विषय :-** लोकशाहीर आण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत वार्ड क्रं.०१ मध्ये प्रमुख चौकात प्रकाश व्यवस्थे करीता हायमास्ट लॅम्प उभारणे.

---

वाचा क्र.१ व विदयुत विभाग प्रमुख, विदयुत विभाग यांचा वाचा क्र. २ व ४ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत वार्ड क्रं.०१ मध्ये प्रमुख चौकात प्रकाश व्यवस्थे करीता हायमास्ट लॅम्प उभारणे कामी महासभा / प्रशासक ठराव क्रं.१६६ दि.२०/०९/२०२४ अन्वये मान्यतेने ई- निविदा सुचना क्र.०३ शासनाचे संकेतस्थळावर प्रसिध्द केली असता ई-निविदा भरण्या करीता दिलेल्या मुदतीत एकुण तीन ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे.

१) सत्यम इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इंजिनिअर्स,भुसावळ
२) इंगळे इलेक्ट्रीकल,जळगांव
३) सावता इलेक्ट्रीकल्स,जळगांव

वरील प्रमाणे तीन ई निविदाधारकांचे प्राप्त कागदपत्रांची छाननी केली असता त्यांनी आवश्यक असलेली कागदपत्रे सादर केलेली नाहीत. निविदा स्पर्धात्मक होण्याच्या दृष्टीने ई निविदेत सहभागी तिनही निविदाधारक यांना निविदा सादर करणे पुर्वीच्या दिनाकांची कागदपत्रे दोन दिवसात संकेतस्थळावर सादर करणे बाबत Sort Fall Document Submission करणे बाबत कळविणेत आले असता ई निविदाधारक सत्यम इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इंजिनिअर्स, भुसावळ यांनी संकेतस्थळावर विहीत मुदतीत कागदपत्रे सादर केलेली नाहीत. त्यामुळे निविदाधारक हे सदर निविदेकरीता अपात्र ठरत आहेत. ई निविदाधारक इंगळे इलेक्ट्रीकल,जळगांव व सावता इलेक्ट्रीकल्स,जळगांव यांनी संकेतस्थळावर विहीत मुदतीत कागदपत्रे सादर केलेली असल्याने ते सदर निविदेकरीता पात्र ठरत आहेत.

करीता १) शासन निर्णय CAT/२०१७ चे प्र.क्रं.०८/इ.मा..०२ मंत्रालय दि.२७/०९/२०१८ व २) शासन निर्णय CAT/२०१७ प्र.क्रं.०८/इ.मा..०२ दि.२०/०५/२०१९ चे शासन निर्णयानुसार ३) शासन निर्णय संकिर्ण २०२१/प्र.क्र.९८/ नवि-१६ दि.०८ जुलै २०२१ अन्वये ई-निविदेत सहभागी ई-निविदाधारक १) इंगळे इलेक्ट्रीकल,जळगांव २) सावता इलेक्ट्रीकल्स,जळगांव पात्र ठरल्याने दोनही पात्र ई-निविदाधारक यांचे आलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार केला असता ई निविदाधारक सावता इलेक्ट्रीकल्स,जळगांव यांचे ई निविदा रक्कमेपेक्षा ०.१०० कमीचे दर हे जास्तचे वाटत असल्याने ई निविदाधारक यांना वाटाघाटीसाठी बोलविले असता ई निविदाधारक यांचेशी झालेल्या दर विश्लेषणाच्या चर्चेअंती सदरचे काम ई निविदा रक्कमेपेक्षा ०.३००% कमीने करण्यास तयार असल्या बाबत ई निविदाधारक यांनी दि.२३/१२/२०२४ रोजी मनपा आवक क्रं.३५१ दि.२३/१२/२०२४ अन्वये लेखी संमती पत्र दिलेले आहे. तरी प्रस्तुत कामास खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.क्रं. | ई निविदा धारकाचे नांव | ई निविदा रक्कम | ई निविदेत आलेले दर | वाटाघाटीअंतीचे दर |
|---|---|---|---|---|
| १ | सावता इलेक्ट्रीकल्स,जळगांव | रु.२५,९८,४३६/- | ई निविदा रक्कमेपेक्षा ०.१०० कमीचे रु.२५,९५,८३८/- | ई निविदा रक्कमेपेक्षा ०.३०० कमीचे रु.२५,९०,६४१/- |

वर नमुद तक्ता पाहता लघुत्तम ई निविदाधारक सावता ईलेक्ट्रीकल्स,जळगांव यांचे दर विश्लेषण अंतीचे दर हे ई निविदा रक्कमेपेक्षा ०.३००% कमीचे म्हणजेच एकुण रक्कम रु.२५,९०,६४१/- मात्रचे आहेत. त्यानुसार सदर कामी एकुण रक्कम रु.२५,९०,६४१/- मात्रचा खर्च अपेक्षीत आहे. ई निविदेत आलेल्या दरानुसार खालीलप्रमाणे १८% GST ची रक्कम समाविष्ठ करण्यात आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | ई निविदाप्रमाणे अपेक्षीत खर्च | रु.२५,९०,६४१/- |
| २ | Add GST १८% | रु.४,६६,३१५/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च | रु.३०,५६,९५६/- |

वर नमुद केलेप्रमाणे ई निविदेत आलेले दर विश्लेषणा अंतीचे दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षित खर्च रक्कम रु.३०,५६,९५६/- मात्र इतका आहे. सदर रक्कम रु.३०,५६,९५६/- मात्रचा खर्च हा लोकशाहीर आण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधारणा योजना निधी अंतर्गत करावयाचा आहे. त्यानुसार लघुत्तम ई निविदाधारक सावता इलेक्ट्रीकल्स,जळगांव यांचे ई निविदा रक्कमेपेक्षा ०.३००% इतके कमीचे दर विश्लेषणा अंतीचे दर स्विकृत करणेस व सदर दरास व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.३०,५६,९५६/- मात्रचे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता मिळणेसाठी विदयुत विभाग प्रमुख, विदयुत विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३८** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०३** **प्रशासक ठराव क्र.:- २२०** **दिनांक :-२२/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/१८१४/२०२४-२५ दि.२१/०१/२०२५
३. निविदा समितीचा दि.१७/०१/२०२५ चा निर्णय.

**विषय :-** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन योजना सन २०२४-२५ जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.०७ मधील रेल्वे कॉलनी परिसरातील रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार नितीश कैलास कापडणे यांचे निविदा रक्कमेइतकेच दरास मान्यता देणे बाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ व ३ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन योजना सन २०२४-२५ अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.०७ मधील रेल्वे कॉलनी परिसरातील रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे कामास जिल्हाधिकारी, जळगांव यांचे कडील पत्र क्रं.नपा/नियोजन/नगरोत्थान योजना/६०/२०२४ दि.२५/०९/२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार ई निविदा प्रसिध्द करण्यास आयुक्त, मनपा यांचे दि.२७/०९/२०२४ च्या मान्यतेनूसार उक्त कामाची ई निविदा सुचना क्र.५५० संकेतस्थळावर प्रसिध्द केली असता निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ मक्तेदारांच्या ई निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या असून आलेल्या ई-निविदा कागदपत्रांची छाननी केली असता त्यात एकच ई निविदा पात्र झाल्याने दुसऱ्या वेळेस ई निविदा प्रसिध्द करण्यास व या करीता येणाऱ्या पर्यायी खर्चास आयुक्त यांनी मान्यता दिल्यानुसार उक्त कामाची दुसऱ्या वेळेस ई निविदा सुचना क्र.७७५ संकेतस्थळावर प्रसिध्द केली असता निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०१ ई निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेली आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रं.सी एटी/२०१७/प्र.क्रं.०८/इमा-२ मंत्रालय मुंबई दि.२७/०९/२०१८ मुद्दा क्रं.४.३ व ४.४ अन्वये दुसऱ्यावेळेस एकच निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे निर्देश आहेत तथापी दुसऱ्या वेळेस एकच निविदा आलेली असल्याने नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार आलेल्या ई-निविदा कागदपत्रांची छाननी केली असता खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असून प्राप्त ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.४१,४०,९७१/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | नितीश कैलास कापडणे | निविदा रक्कमेइतकेचेच दर | रु.४१,४०,९७१/- |

वरील तुलनात्मक तकत्यानूसार मक्तेदार नितीश कैलास कापडणे यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेइतकेचेच कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.४१,४०,९७१/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस, व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | ४१,४०,९७१/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | ७,४५,३७५ |
| ०३ | कामगार विमा १% | ४१,४१०/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | १५,८२५ |
| ०५ | रॉयल्टी चार्जेस | ५५,९६२/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. :- | ४९,९९,५४३/- |

वर नमुद निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.४९,९९,५४३/- मात्र आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम रु.३४,९९,६८०/- मात्र महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन योजने अंतर्गत ७०% निधीतुन व याच योजनेतील मनपा हिस्सा ३०% रक्कम रु.१४,९९,८६३/- मात्र मनपा निधीतुन चे लेखा शिर्ष महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान मनपा हिस्सा या लेखाशिर्षतुन करावा लागणार आहे. त्याअनुषंगाने मक्तेदार नितीश कैलास कापडणे यांचे निविदा रक्कमेइतकेचेच कमीचे दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता मिळणेसाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ३ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३८** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०४** **प्रशासक ठराव क्र.:- २२१** **दिनांक :-२२/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/प्रकल्प/१४९/२०२४-२५ दि.२१/०१/२०२५
३. शहर अभियंता यांचा दि.१७/०१/२०२५ चा अभिप्राय
४. निविदा समितीचा दि.१७/०१/२०२५ चा निर्णय.

**विषय :-** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत जळगांव शहरातील कचरा डंपींग ग्राऊंड वरील कचऱ्याची विल्हेवाट लावणे (बायोमायनिंग करणे) कामी मक्तेदार कोअर प्रोजेक्ट इंजिनिअर्स ॲन्ड कन्सल्टंटंस प्रा.लि.,अमरावती यांचे निविदा रक्कमेपेक्षा ९.९९०% कमीचे दरास मान्यता देणे बाबत.

---

वाचा क्र.१ व प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत जळगांव शहरातील कचरा डंपींग ग्राऊंड वरील कचऱ्याची विल्हेवाट लावणे (बायोमायनिंग करणे) कामाचा प्रकल्प अहवाल रक्कम रु.१४३७२१९७८/- मात्रचा तयार करण्यात आला. सदर अहवालास महासभा/प्रशासक ठराव क्रं.१५८ दि.१२/०९/२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार सदरच्या प्रकल्प अहवालास मुख्य अभियंता नाशिक विभाग महाराष्ट्र जिवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग नाशिक यांच्या कडुन पत्र क्रं. जा.क्रं.मजिप्रा/नाशिक/चिशा/२६८३/२०२४ दि.०१/१०/२०२४ अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुसार उक्त कामास ई निविदा प्रसिध्द करण्यास आयुक्त, मनपा यांचे दि.०३/१०/२०२४ च्या मान्यतेनूसार उक्त कामाची ई निविदा सुचना क्र.५६३ संकेतस्थळावर प्रसिध्द केली असता निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०३ मक्तेदारांच्या ई निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या असून आलेल्या ई-निविदांचे कागदपत्रांची छाननी केली असता निविदाधारक श्री.प्रदीप हनुमंत जाधव,पुणे यांना अपात्र ठरविण्यात आले आहे व खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने प्राप्त ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.१३,६०,९४,०६४/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | साई गणेश एंन्टप्रायजेस,पालघर | निविदा रक्कमेपेक्षा ४.५००% कमीचे दराने | रु.१२,९९,६९,८३१/- |
| २ | कोअर प्रोजेक्ट इंजिनिअर्स ॲन्ड कन्सल्टंटंस प्रा.लि.,अमरावती | निविदा रक्कमेपेक्षा ९.९९०% कमीचे दराने | रु.१२,२४,९८,२६७/- |

वरील तुलनात्मक तकत्यानूसार मक्तेदार कोअर प्रोजेक्ट इंजिनिअर्स ॲन्ड कन्सल्टंटंस प्रा.लि.,अमरावती यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा ९.९९०% कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.१२,२४,९८,२६७/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस, व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| अ.क्रं. | रक्कम | निविदा रक्कमेपेक्षा ९.९९०% कमीचे | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| पार्ट A | १०,८८,३८,३२०/- | १,०८,७२,९४८/- | रु.९,७९,६५,३७२/- |
| पार्ट B | २,७२,५५,७४४/- | २७,२२,८४९/- | रु.२,४५,३२,८९५/- |
| | | एकुण :- | रु.१२,२४,९८,२६७/- |

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | १२,२४,९८,२६७/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% पार्ट B रक्कम रु.२,४५,३२,८९५/- करीता | ४४,१५,९२१/- |
| ०३ | कामगार विमा १% पार्ट A + पार्ट B | १२,२४,९८३/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. :- | १२,८१,३९,१७१/- |
| ०४ | तांत्रिक लेखा परिक्षण फी | १३,६०,९४०/- |
| | प्रकल्पाची एकुण खर्च रक्कम रु. :- | १२,९५,००,१११/- |

वर नमुद निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.१२,९५,००,१११/- मात्र आहे. परंतु मक्तेदार कोअर प्रोजेक्ट इंजिनिअर्स ॲन्ड कन्सल्टंटंस प्रा.लि.,अमरावती यांचे निविदा रक्कमेपक्षा ९.९९०% कमीचे दर सर्वात कमी आलेले असुन निविदा अटी शर्ती नुसार त्यांच्या कडुन १% परफार्मन्स सिक्युरिटी अनामत रक्कम मनपा खजिन्यात भरणा करण्यासाठी तसेच या कामी भरलेल्या कमी दरात काम कसे पूर्ण करणार या बाबत नियोजन मागविण्यासाठी मक्तेदार यांना पत्र क्रं.साबा/१७४० दि.०२/०१/२०२५ अन्वये कळविले असता मक्तेदार यांनी मनपा पावती क्रं.७५८६ दि.१४/०१/२०२५ रोजी डि.डी. क्रं.१५४४६१ रक्कम रु.१२,८१,३९२/- मात्रचा जमा केलेला आहे. नियोजन बाबत खुलासा सादर केलेला आहे. सदर कामी वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.१२,९५,००,१११/- मात्र आहे.

या कामावर होणाऱ्या खर्चाबाबतचा अहवाल स्वच्छ भारत मिशन महाराष्ट्र राज्य यांच्या कडेस पाठविण्यात आलेला आहे. या बाबतच्या खर्चास शासनाकडुन अनुदान मिळाल्यास अनुदानातुन अथवा मनपा निधीतुन " साठलेला कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया करणे या लेखा शिर्षअंतर्गत " करावा लागणार आहे. त्याअनुषंगाने मक्तेदार कोअर प्रोजेक्ट इंजिनिअर्स ॲन्ड कन्सल्टंटंस प्रा.लि.,अमरावती यांचे निविदा रक्कमेपेक्षा ९.९९०% कमीचे दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता मिळणेसाठी प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३८** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०५** **प्रशासक ठराव क्र.:- २२२** **दिनांक :-२२/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/प्रकल्प/१५०/२०२४-२५ दि.२१/०१/२०२५
३. शहर अभियंता यांचा दि.२०/०१/२०२५ चा अभिप्राय
४. निविदा समितीचा दि.२०/०१/२०२५ चा निर्णय.

**विषय :-** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत CSWAP (City Solid Waste Action Plan) मधील मंजुर घटक Transfer Station प्रकल्प उभारणे कामी मक्तेदार श्री श्री इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दरास मान्यता देणे बाबत.

---

वाचा क्र.१ व प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत CSWAP (City Solid Waste Action Plan) मधील मंजुर घटक Transfer Station प्रकल्प उभारणे कामाचा प्रकल्प अहवाल रक्कम रु.८,९९,८६,७०८/- मात्रचा तयार करण्यात आला. सदर अहवालास महासभा/प्रशासक ठराव क्रं.११७३ दि.०७/०७/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार सदरच्या प्रकल्प अहवालास मुख्य अभियंता नाशिक विभाग महाराष्ट्र जिवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग नाशिक यांच्या कडुन पत्र क्रं. जा.क्रं.मजिप्रा/नाशिक/चिशा/१६३१/२०२४ दि.२६/०६/२०२४ अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुसार उक्त कामास महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रं.स्वमअ-२०२४/CN८४३७१०/नवि-३४ मंत्रालय, मुंबई दि.२४/०९/२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार उक्त कामास ई निविदा प्रसिध्द करण्यास आयुक्त, मनपा यांचे दि.०३/१०/२०२४ च्या मान्यतेनूसार उक्त कामाची ई निविदा सुचना क्र.५६४ संकेतस्थळावर प्रसिध्द केली असता निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ मक्तेदारांच्या ई निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या असून महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार आलेल्या ई-निविदांचे कागदपत्रांची छाननी केली असता खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने प्राप्त ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.४,२१,३२,१९७/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | श्री श्री इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | निविदा रक्कमेइतकेचेच दराने | रु.४,२१,३२,१९७/- |
| २ | प्रोपोरशन्स | निविदा रक्कमेवर ५% जास्तीचे दराने | रु.४,४२,३८,८०७/- |

वरील तुलनात्मक तकत्यानूसार मक्तेदार श्री श्री इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर का मी रक्कम रु.४,२१,३२,१९७/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. सदर रक्कमेमध्ये कामगार विमा १% व रॉयल्टी चार्जेस समाविष्ठ आहेत. सदरच्या एकुण रक्कमेतुन कामगार विमा व रॉयल्टी चार्जेस वजा जाता कामाची एकुण रक्कम रु.४,११,६४,४५४/- मात्र होत आहे. नमुद प्रमाणे आलेल्या रक्कमेनुसार जि.एस.टी., कामगार विमा, रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | ४,११,६४,४५४/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | ७४,०९,६०२/- |
| ०३ | कामगार विमा १% | ४,११,६४५/- |
| ०४ | रॉयल्टी चार्जेस | ५,५६,०९८/- |
| | एकुण खर्च रक्कम रु. :- | ४,९५,४१,७९९/- |
| ०५ | महाराष्ट्र जिवन प्राधिकार फी १% | ४,९५,४१८/- |
| ०६ | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार फी २.६५% | १३,१२,८५८/- |
| | एकुण :- | ५,१३,५०,०७५/- |
| ०७ | तांत्रिक लेखा परिक्षण फी | ४,९५,४१८/- |
| | प्रकल्पाचा एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :- | ५,१८,४५,४९३/- |

वर नमुद निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.५,१८,४५,४९३/- मात्र आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम रु.५,१३,५०,०७५/- X ७०% (३३% केंद्र सरकार हिस्सा, ३७% राज्य शासन हिस्सा) ३,५९,४५,०५२/- मात्र शासन निर्णय क्रं. अन्वये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० या योजने अंतर्गतच्या निधीतुन करावा लागणार आहे. उर्वरीत खर्च रु.५,१३,५०,०७५ X ३०% = १,५४,०५,०२३/- + तांत्रिक लेखा परिक्षण फी रु.४,९५,४१८/- = रु.१,५९,००,४४०/- मात्र मनपा निधीतुन स्वच्छ महाराष्ट्र अभियान मनपा हिस्सा (स्थापत्य कामे) लेखा शिर्षातुन खर्च करावा लागणार आहे. त्याअनुषंगाने मक्तेदार श्री श्री इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे निविदा रक्कमेत प्राप्त दर स्विकारणेस, संविदा करणेस व येणारा खर्च रक्कम रु.५,१८,४५,४९३/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता मिळणेसाठी प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३८** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०६** **प्रशासक ठराव क्र.:-२२३** **दिनांक :-२२/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदा.

**विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

---

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१२१ दि.२१/०१/२०२५ नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजना २०२४-२५ अंतर्गत प्रभाग क्रं.१६ मधील परमार्थ साधन परिसरातील आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे कामी मक्तेदार अनिकेत मिलींद चौधरी यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.९९% सर्वात कमी चे दर स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.९,८७,६४५/- मात्र खर्चाची संविदा.

२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./११८ दि.२१/०१/२०२५ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन सन २०२४-२५ योजना अंतर्गत प्रभाग क्र.११ मधील विदयुत कॉलनी मध्ये श्री तिवारी यांच्या घराजवळ आर.सी.सी.गटार बांधणे कामी मक्तेदार समर्थ डेव्हलपर्स यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.९,९४,३६०/- मात्र खर्चाची संविदा.

३. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./११९ दि.२१/०१/२०२५ लोकशाहीर आण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधारणा योजना २०२४-२५ अंतर्गत प्रभाग क्र.१३ मधील सर्वे नं.४१५/१ हॉटेल मराठा गार्डन भागात रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार हर्षल हिरालाल सोनवणे यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.९,२७,०३८/- मात्र खर्चाची संविदा.

४. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१२० दि.२१/०१/२०२५ लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजना २०२४-२५ अंतर्गत प्रभाग क्र.१३ मधील मेहरुण शिवार आदर्श नगर मध्ये आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे कामी मक्तेदार कुणाल प्रभाकर खर्चे यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.९,९८,४६६/- मात्र खर्चाची संविदा.

उपरोक्त वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार संविदांची माहिती घेतली.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**